महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग**

**सहायक संचालक नगर रचना वर्धा यांचे कार्यालय**

दूरध्वनी क्र. 07152-242639

ई-मेल : townplanner1wardha@rediffmail.com

जिल्हा क्रीडा संकुल, डॉ. आंबेडकर चौक,
सिव्हील लाईन्स, वर्धा- 442001


उप-विभागीय अधिकारी, वर्धा
प्रस्तु-3
10 मे 2023
2621
र.न.

जा.क्र.बांध.पर./मुदतवाढ/मो.सावंगी (मे)/स.क्र.422/भू.क्र.21,22,23,24 /ससंनरव/ 941 दि.08 /05/2023

प्रति,
उपविभागीय अधिकारी,
वर्धा

**विषय :- बांधकाम परवाना मंजूरीच्या आदेशाचे नुतनीकरण करण्याबाबत.**

**संदर्भ** :- 1) या कार्यालयाचे पत्र क्र.बांध.पर./सावंगी (मे)/ता.वर्धा/स.क्र.जुना 74/1,84/2, नविन 422/ भू.क्र.21,22,23,24/ससंनरव/557, दिनांक 24/02/2021

2) आपले प्रारंभ प्रमाणपत्र क्र.प्रस्तु-3/बांधकाम/उविअ/कावि/S.R./102/2021, दिनांक 08/04/2021

3) आपले पत्र क्र.प्रस्तु-3/बांध/उविअ/कावि-73/2023, दिनांक 17/04/2023

**अर्जदार** :- श्री.गणेशलाल मोतीलाल साहु, रा.सावंगी (मेघे), ता.जि.वर्धा

संदर्भित पत्र क्र.3 अन्वये अर्जदार श्री.गणेशलाल मोतीलाल साहु यांनी मौजा सावंगी (मेघे), सर्व्हे क्र. 422, भू.क्र. 21,22,23,24 येथील ईमारतीचे बांधकाम सद्य परिस्थीतीमध्ये पुर्ण न झाल्याने जागेवरील ईमारत बांधकाम परवानगीचे नुतनीकरण करुन मिळणेबाबत अर्ज आपले कार्यालयात सादर केलेला असून, या कार्यालयात आवश्यक कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला आहे.

विषयांकीत जागेच्या बांधकाम नकाशास या कार्यालयाने संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये मंजूरीसाठी शिफारस केली असून, उपविभागीय अधिकारी, वर्धा यांनी संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये बांधकाम मंजूरी प्रदान केलेली आहे.

उपविभागीय अधिकारी, वर्धा यांच्या आदेशातील क्र. 6 मधील अटीनुसार या बांधकाम परवान्याची मुदत परवानगी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाची आहे. या कालावधीत बांधकाम पुर्ण न झाल्यास मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात यावे, असे नमूद आहे. तथापि विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्रमांक 2.7.1 मधील तरतुदीनुसार प्रारंभ प्रमाणपत्र / विकास परवानगी 4 वर्षांच्या कालावधीकरीता वैध असून, परवानगी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाचे आत बांधकाम सुरू न झाल्यास मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करता येईल, असे प्रावधान आहे.

विषयांकीत प्रकरणी अर्जदार यांनी दिनांक 12/04/2023 चे अर्जान्वये बांधकामाकरीता मुदतवाढ अपेक्षिलेली आहे. अर्जदार यांनी ईमारतीचे बांधकाम विहीत मुदतीत सुरु केले असल्याने नुतनीकरण करणेची आवश्यकता नाही. तथापि आपले संदर्भित क्र. 2 मधील अ.क्र. 6 मधील अटीमध्ये वर नमुद केल्यानुसार दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

(भ.गं.आईटवार)
प्र.सहायक संचालक, नगर रचना,
शाखा कार्यालय, वर्धा

Letter SAWAKARE-2-2023

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,वर्धा
उपविभागीय अधिकारी कार्यालय, वर्धा
महात्मा गांधी पुतळयाजवळ, सिव्हील लाईन,वर्धा

दुरध्वनी क्रमांक (07152) 242561 ई-मेल- sdowardha@gmail.com

क्र.प्रस्तु-3/बांध/उविअ/कावि- 98 /2023 दिनांक : 18/05/2023

प्रति,

श्री.गणेशलाल मोतीलाल साहु
रा.सावंगी (मे) ता.जि.वर्धा

विषय: बांधकाम परवाना मंजुरीच्या आदेशाचे नुतनीकरण करणेबाबत.
मौजा सावंगी (मे) ता.जि.वर्धा स.क्र.422, भुखंड क्र. 21,22,23,24

संदर्भ: 1) नगर रचना कार्यालयाचे पत्र क्र.बांध.पर./मौ.सावंगी (मे)/ता.वर्धा/स.क्र.जुना74/1,84/2, नविन 422//भु.क्र.21,22,23,24/ससंनरव/557 दि.24/02/2021
2) या कार्यालयाचे पत्र क्र.प्रस्तु-3/बांध/उविअ/कावि/S.R.102/2021 दिनांक 8/04/2021
3) आपला अर्ज दिनांक 12/4/2023
4) या कार्यालयाचे पत्र क्र.प्रस्तु-3/बांध/उविअ/कावि-73/2023 दिनांक 17/04/2023
5) नगर रचना कार्यालयाचे पत्र जा.क्र.बांध.पर./मुदतवाढ/मौ.सावंगी (मे)/स.क्र.422/ भु.क्र.21,22,23,24/ससनरव/941 दि.8/05/2023

उपरोक्त विषयाचे अनुषगाने आपण मौजा सावंगी (मे) येथील ईमारत बांधकाम परवानगीचे नुतनीकरण करुन मिळणेबाबत अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भांकित पत्र क्र.4 अन्वये मुदतवाढीबाबत नगर रचनाकार, वर्धा यांचा अभिप्राय मागविण्यात आला. त्याअनुषगाने नगर रचनाकार,वर्धा यांचा संदर्भांकित पत्र क्र. 5 अन्वये अहवाल प्राप्त झालेला असुन सदर अहवालानुसार मौजा सावंगी (मे) ता.वर्धा येथील स.क्र.422 भुखंड क्र.21,22,23,24 ला नगर रचनाकार, वर्धा यांचे संदर्भांकित पत्र क्र.1 अन्वये मंजुरीची शिफारस केलेली असुन या कार्यालयाचे संदर्भांकित पत्र क्र. 2 अन्वये आपणास बांधकाम मंजुरी देण्यात आलेली होती. तथापि या कार्यालयाचे आदेशातील अट क्र.6 नुसार या बांधकाम परवान्याची मुदत परवानगी प्राप्त झाल्याच्या तारखेपासुन एक वर्षाची आहे. या कालावधीत बांधकाम पुर्ण न झाल्यास मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात यावे, असे नमुद आहे. तथापि विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.2.7.1 मधील तरतुदीनुसार प्रारंभ प्रमाणपत्र/विकास परवानगी 4 वर्षाच्या कालावधीकरीता वैध असुन, परवानगी प्राप्त झाल्याच्या तारखेपासुन एक वर्षाचे आत बांधकाम सुरु न झाल्यास मुदत संपण्यापुर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करता येईल, असे प्रावधान आहे.

सबब विषयांकित प्रकरणी आपण दिनांक 12/04/2023 चे अर्जान्वये बांधकामाकरीता मुदतवाढ अपेक्षिलेली आहे. नगर रचना कार्यालयाचे संदर्भांकित पत्र क्र.5 अन्वये अर्जदार यांनी ईमारतीचे बांधकाम विहीत मुदतीत सुरु केले असल्याने नुतनीकरण करणेची आवश्यकता नसल्याबाबत कळविले आहे. तथापि आपण ईमारतीचे बांधकाम विहीत मुदतीत सुरु केले असल्याने आपणास ईमारत बांधकाम परवानगी नुतनीकरणाची आवश्यकता नाही.

उपविभागीय अधिकारी,वर्धा